म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय धा० वा०
दा. क्र. १९०२


# भगवी गीता

IRBK-0101902
IRBK-0101902

म. ग्रं. सं. ठाणें
[illegible]
नं. ३९४

# गवी गीता

यशवन्त
[राजकवि, बडोदें]



भारत प्रकाशन संस्था

६१०४०. १९०२.

बालवाङ्मय माला ३०

~~१६५२.~~ क्रमांक ११३०८ वाग. ८०४.

# भगवी गीता

आणि

# चंदूचा गनीमी कावा

: लेखक :

यशवन्त दिनकर पेण्ढरकर
[ राजकवि, बडोदें ]

९९०२.

किंमत ८ आणे

IRBK-0101902
IRBK-0101902

: प्रकाशक :

नवभारत प्रकाशनसंस्था, मुंबई ४.

प्रकाशक—
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशन संस्था,
६, केळेवाडी, मुंबई नं. ४

प्रथमावृत्ति, डिसेंबर १९४३

मुद्रक—
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस
गिरगांव, मुंबई ४.

11368

# अर्पण-पत्रिका

भाचा चि. वसन्त आंबिकर

आणि

पुतण्या चि. शरद् कुमार

यांना आशीर्वादपूर्वक

# प्रस्तावना

रामदास स्वामींनीं मठांची उठाठेव प्रचंड प्रमाणावर केली, शिष्यांचें जंजाळ निर्मिलें आणि भिक्षेची दीक्षा दिली. मनोबोधाचा एकादा श्लोक म्हणून भिक्षा मागायची असा त्यांचा परिपाठ होताः—

*" कांहीं भिक्षा आहे, पुसावें । अल्पसंतोषी असावें ।*
*बहुत आणितां घ्यावें । मुष्टि एक "*

अशा शब्दांनीं त्यांनीं भिक्षा-वृत्तींत हावरेपणाला प्रतिबंध तर केलाच पण तीसंबंधीं

*भिक्षेनें ओळखी होती । भिक्षेनें श्रम चुकती*
*स्वतंत्रता ईश्वरप्राप्ती । भिक्षागुणें.*
*नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटन करावें*
*तरीच भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें.*

* * *

*हिंडता पारखी लोकां । कार्यकर्ता जिवीं धरी*

असें त्यांचें समर्थन आहे. ह्यावरून लोकजागृति आणि लोकसंग्रह हें त्यांचें एक उद्दिष्ट स्पष्ट दिसतें. पुढें दिलेल्या गोष्टींत ह्याच थाट अनुसरून, त्रिविधता आणली आहे. मुख्य गोष्ट खरीच आहे; पण करंजींत जसें सारण भरतात तसेंच ह्या खऱ्या गोष्टींत हरदासी कथेचें सारण भरलें आहे. करंजी करतांना चिरणें हातीं धरावें लागतें किंवा मुरड घालावी लागते त्याबद्दल मला कोणी दोष देणार नाहीं अशी आशा आहे.

सातारा
१८६५ श्रावण व॥ १२

यशवंत

ग्रंथ ... वा वा ६५

# भगवी गीता

" चला बाई, आंथरुणं आधीं घातलीं पाहिजेत. " कला-कुमार यांची आई म्हणाली.

" कां ? इतकी कसली घाई ? " नानांनीं विचारलं.

" बघायचं ना; कुमार जेवायला बसलाय खरा, पण झोंपेनंच त्याला खाऊन टाकलंय ! " आईनं सांगितलं.

" खरंच, आज सकाळची शाळा होती नाहीं का ? लवकर उठलेलीं मुलं लवकर निजणारच. " नाना म्हणाले.

" नाहीं अं नाना ! आम्ही नाहीं लवकर निजणार ! "

" कोण ? कला असेल म्हणत ही ? गोष्टीची खंडणी वसूल केल्याशिवाय तिला कुठली झाप लागायला ? " नाना म्हणाले.

" खंडणी नव्हे, मुखशुद्धि " आई आंथरुणं झटकतां झटकतां बोलत होती.

" नाना गोष्ट सांगितलीच पाहिजे अं. " असें घोकत घोकत, कला आंचवून आली देखील घाईनं. " हं, सांगा गोष्ट. "

" खरखर-मुंड्यापेक्षां देखील चिकट आहे ही कला ! " नाना एवढें म्हणाले तोंच कुमारही तिथें हजर झाला. त्यानें विचारलं " खरखर-मुंड्या म्हणजे ? "

" असतो एक जातीचा भिकारी ! भिक्षा घेतल्याशिवाय दारांतून हालायचा नाहीं तो. लोखंडी कडयांचा एक झुबका असतो त्याच्या हातांत. तो खळाखळा वाजवून तो भिक्षेकरी घर-मालकाचं डोकं उठवतोच; पण भिक्षा मिळाली नाहीं तर, त्या झुबक्याचा जो लोखंडी दांडा असतो त्यानं स्वताचंही डोकं फोडून घ्यायला तो मागं पुढं पाहत नाहीं. म्हणून त्याला ' डोईफोडया ' देखील म्हणतात. त्याच जातींतली आमची ही कला ! "

" पण मी कांहीं माझं डोकं नाहीं फोडून घेणार. " कला म्हणाली.

" पण माझं डोकं उठवतेस कीं रोज ! " नाना म्हणाले.

" मग, गोष्टीची भिक्षा घाला म्हणजे झालं. "

" हां ! हां ! आज भिक्षेकऱ्याचीच गोष्ट सांगतों. " नाना तयार झाले. कुमाराची झोंप आतां पार उडाली. तो म्हणाला, " मी ओळखूं ? तुम्ही आम्हांला चिलयाची गोष्ट सांगणार ना ? "

" ती नको नाना ! फार घाणेरडी आहे ती गोष्ट ! " कलानं नापसंतीचा अभिप्राय दिला.

**नाना**—ती नाहीं मी सांगणार दुसरीच आहे एक.

" मग विश्वामित्र न् हरिश्चंद्र यांची गोष्ट सांगणार असाल ? " कुमारनें पुन्हां तर्क केला.

" ती आहे आम्हाला ठाऊक " कला म्हणाली.

" छे, छे ! आमचा भिक्षेकरी विश्वामित्रासारखा छळवादी नाहीं. निराळीच गोष्ट सांगणार आहे मी; पुराणांतली नाहीं, इतिहासांतली आहे. खरीच आहे मुख्यतः ! पण मधेंच जरा हरदासी भाग आहे. एका अं ! " इतकी प्रस्तावना करून नानांनीं सुरवात केली.

१

रामदास स्वामी, आहे का हें नांव माहीत ?

हो ! आपल्या चाफळचेच कीं ते ! रामाचं देऊळ त्यांनींच बांधलं कीं तिथलं !

हां ! त्यांचीच गोष्ट सांगतों. ते भिक्षा मागत असत. त्यांना स्वतःचं घर नव्हतं,—ते पळून आले होते घरांतून; नोकरी नव्हती, —ती त्यांना करायचीच नव्हती. ते होते साधुबुवा; पण लोकांचं भलं कसं होईल ही त्यांना काळजी फार. भिक्षा मागत हिंडायचं आणि हिंडून देव-धर्माबद्दल लोकांना उपदेश करायचा, असा त्यांचा बाणा होता. आज ह्या गांवीं तर उद्यां त्या गांवीं !

असेंच कुठल्याशा गांवीं एक दिवस ते गेले होते. आणि भिक्षा मागत, एका अगदीं मोडकळीस आलेल्या भिकार घराच्या अंगणांत येऊन उभे राहिले आणि गरजले " ॐ भवति भिक्षान्देहि. "

इतक्यांत एक बाई पडवीवर आली आणि म्हणाली " साधुबुवा, पुढल्या दारीं व्हा. " दोघांत संभाषण सुरू झालं.

राम०:—पण, तुम्ही कांहीं तरी वाढा कीं !

बाई०:—काय वाढू बाबा ? तूंच बघतो आहेस ना ? ज्या दारांतनं आंत आलास त्याची चौकट कशी कोसळायला झाली आहे ती ? ह्या बाजूच्या भिंतीचं माझ्यासारखंच कंबरडं मोडलं आहे. माझ्या पांगलेल्या भांगाप्रमाणेंच हें कौलार पांगून गलंय. मागिलदारच्या कुसवानं लोटांगण घातलंय तेंही बघून ये पाहिजे तर ! खुश्शाल जा घरांतनं ! आहे काय घरांत तूं नेशील म्हणून ? ह्या असल्या घरांत मी राहत्येय अन् माझ्या सोबतीला आहे दळिद्र ! मग काय घालूं तुला ?

**राम०:**—बाई, नाहीं म्हणूं नये. ( गोष्ट ऐकत असलेला शरद हळूच पुटपुटला " आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढतीं पाहूं नको " )

**बाई०:**—पुन्हां तेंच ! पण, घालूं काय तुला ? ढेकळं ?



**राम०:**—घाल, ढेकळं घाल. तुझ्या अंगणांत त्यांचा तर तुटवडा नाहीं ? असं कर, एक चिमुटभर माती घे आणि ती माझ्या झोळींत घाल.

**बाई०:**—माझी थट्टा करताय, साधूबुवा ?

**राम०:**—तसं नव्हे बाई !

**बाई०:**—तसं नव्हे तर मग काय ? चिमुट चिमुट माती गोळा करून, आपल्या मठाला गिलावा करणार आहांत ?

राम०:—तसाही दाता कोणी तरी भेटेलच कीं !

बाई०:—मग ह्या झोळींतल्या अन्नांत माती कालवून पापाची धनीण होऊं ? अन् कुठूं फेडूं तें पाप ?

राम०:—मीच तशी भिक्षा मागितल्यावर पाप तुम्हांला कसं लागेल बाई ?

बाई०:—माझ्या घरच्या मातींत सोन्याचे कण दिसले वाटतं तुमच्या दिव्य दृष्टीला ?

राम०:—सोन्याचा लोभ संन्याशाला नसतो.

बाई०:—मातींत धान्य पिकतं म्हणून, धान्याऐवजीं माझ्या घरची माती खायची वासना झालीय वाटतं स्वामीमहाराजांना ? अन्, अंवतींभंवतीं इतकीं धनधान्यसमृद्ध घरं असतांना ?

राम०:—बाई, नुसती माती वाढायची देखील तुम्हाला बुद्धि होत नाहीं ना ?

बाईच्या डोळ्यांना टचकन् पाणी आलं. तिचा कंठ दाटून आला. ती डोळ्यांना पदर लावून म्हणाली " मला हिणवूं नये स्वामीमहाराजांनीं. "

रामदासस्वामी तिची समजूत घालूं लागले. " बाई, मी तुमची चेष्टा तरी कशाला करूं आणि हिणवूं तरी कशाला ? तुम्ही वाईट वाटून घेऊं नका. गरिबी हा कांहीं कुणाचा दोष नाहीं. पण ' नाहीं ' म्हणून भिक्षेकऱ्याला वाटेला लावणं मात्र चूक आहे. भीक घालण्यापुरतंही घरांत धान्य नाहीं म्हणून आज ' नाहीं ' म्हणालांत, उद्यांही तसंच ' नाहीं ' म्हणालांत, परवांही तशीच पाळी आली म्हणजे असंच ' नाहीं, नाहीं ' म्हणायची तुम्हांला संवयच लागेल. रोज

रोज ‘ नाहीं ’ म्हणून, भिक्षेकऱ्याला वाटेला लावण्याचं तुम्हांला कांहींच वाटेनासं झालं कीं, पुढं कधीं काळीं तुमची स्थिति सुधारली तरी असाच न-कार देत जाल. तशी संवय लागूं नये म्हणून तुम्ही मला अंगणांतल्या चिमुटभर मातीचीच भिक्षा घाला—आज घाला, उद्यां घाला ! आणि अशा रीतीनं हाताला दान देण्याची संवय लागली म्हणजे, जेव्हां कधीं काळीं भिक्षा वाढायची तुम्हांला ऐपत येईल तेव्हां आपोआप अंगणांतल्या वाळवणांतलं, घरांतल्या उतरंडींतलं धान्य वाढायची तुम्हांला बुद्धि होईल. ”

बाईला साधुबुवांच्या म्हणण्यांतलं अक्षर न् अक्षर पटलं. ती म्हणाली “ बुवा, तुम्ही मोठे थोर ज्ञानी पुरुष दिसतां. तुमचा हा उपदेश मला इतका मोलाचा वाटतो कीं तुमच्यावरून मी माझी कुडी ओंवाळून टाकतें. आजपासून मी तुमची शिष्या झालें आहे; तुम्हीं मला सद्गुरू भेटलांत. जय गुरुमहाराज ! ” इतकं म्हणून तिनं त्यांच्या पायांवर डोकं ठेवलं; आणि खरोखरीच त्यांच्या शिकवणुकीप्रमाणं अंगणांतली चिमुटभर माती घेऊन त्यांच्या झोळींत घातली. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. आपल्या हातून हें जें पाप घडत आहे तें अश्रु गाळूनच ती धुवून टाकीत होती जणुं काय !

“ कल्याण करी रामराया ” असा आशीर्वाद देऊन स्वामीमहाराज निघून गेले.

रोज हाच क्रम चालू झाला. लोकांना तिची दया आली. हळूंहळूं बाईला काम मिळूं लागलं. शेजाऱ्यापाजाऱ्यांचं दळण दळावं, कुणाकडे स्वयंपाकाला जावं, कुणा अनाथ आजाऱ्यांची, लुळ्या-पांगळ्यांची सेवा-शुश्रुषा करावी—अशा तऱ्हेनें काबाडकष्ट करून ती पोटाला

मिळवूं लागली. आणि जसजशी मिळकत होऊं लागली तसतशी तिच्या घरांत गाडगीं—मडकीं धान्यानं भरूं लागलीं. आणि मग, रामदासस्वामी किंवा आणखी कुणी भिक्षेला आले कीं त्यांना ती नेमानें धान्य घालूं लागली. ती भक्तिभावानं म्हणायची "गुरुमहाराज, तुमच्या कृपेनं, तुमच्या आशीर्वादानं, तुमच्या पायधुळीनं माझ्या घरांत लक्ष्मी नांदूं लागलीय ! माझ्यापुरतं ठीक चाललंय !" स्वामीमहाराजांनाही तिचा कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा, सद्भावना पाहून अतीशय संतोष होई. ते म्हणत—

*समर्थाचिया सेवका वक्र पाहे*
*असा सर्व भूमण्डळीं कोण आहे*
*जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही*
*नुपेक्षी कदा राम दासाभिमानी*

आणि तिनें घातलेली भिक्षा मोठ्या प्रेमानें घेऊन, "जय जय रघुवीर समर्थ" अशी गर्जना करीत निघून जात.

२

कुमारनें एक शंका विचारली. "त्या बाईच्या घराशेजारीं जर मोठमोठे श्रीमंत लोक होते तर रामदासस्वामी त्यांच्याकडे कां भिक्षेला गेले नाहींत ?"

नाना म्हणाले "बरोबर आहे तुझी शंका. त्या मोठ्या लोकांपैकींच एकाची गोष्ट आतां सांगणार आहें. त्या बाईच्या घरासमोरच एक टोलेजंग वाडा होता. त्या वाड्याकडे पाहिलं कीं सहज कल्पना येई कीं, इथं कोणी तरी श्रीमंत लोक राहत असावेत. आणि कल्पना कांहीं खोटी नव्हती. एक श्रीमंत सावकार तिथें राहत असे.

" सावकार म्हणजे काय ? " कुमारनें विचारलें.

" अरे कुमार, सावकार म्हणजे खूप पैसेवाला मनुष्य " अशी कलानं त्याची समजूत घातली.

" नुसता पैसेवाला नव्हे " नाना समजावून सांगूं लागले.

" ते पैसे गरजू मंडळींना वापरायला द्यायचे अन् ते परत घेतांना त्याबद्दल वरती आणखी ज्यास्त पैसे घ्यायचे. असा जो धंदा करतो तो सावकार. "

" ज्यास्त कां पैसे घ्यायचे ? " कुमारची जिज्ञासा त्याला गप्प बसूं देईना.

नाना म्हणाले " हें बघ, आपण ह्या लोकांच्या घरांत राहतों. ह घर वापरण्याबद्दल आपण घरमालकाला भाडें देतों कीं नाहीं ? अन् शिवाय त्याचें त्याला घरही परत देतोंच ? तसेंच, ज्याचे पैसे वापरायला घ्यायचे त्याला त्यासाठीं निराळे पैसे द्यावे लागतात. ह्यालाच म्हणतात व्याज. "

" वा: ! चांगला आहे कीं हा धंदा ! " कुमार म्हणाला.

" कोणताही धंदा सरळपणानें केला तर चांगलाच असतो. पण त्यांत लबाडी आणि दुष्ट बुद्धि आली कीं मग त्या धंदेवाल्यास कोण चांगला म्हणणार ? " नाना म्हणाले.

**कुमारः**—मग हा गोष्टींतला सावकार चांगला होता का वाईट होता ?

**नानाः**—पहिल्या-पहिल्यांदा चांगला होता. पण पुढें पुढें त्यांची बुद्धि खोटी झाली.

**कलाः**—म्हणजे कशी ?

नाना:—समजा, त्याच्याकडून एका शेतकऱ्यानं पंचवीस रुपये मागून नेले; आणि नेतांना ठरलं कीं ते परत करतांना एका रुपया-बद्दल एका महिन्याला एक पैसा ह्या हिशेबानं शेतकऱ्यानं व्याज द्यायचं. ठरल्याप्रमाणें हिशेब केला तर सरळपणा झाला. पण बहुतेक शेतकरी अडाणी असतात. त्यांना हिशेब कळत नाहीं. आठ महिन्यांनीं शेतकऱ्यानें पैसे परत आणले असें समजूं. तर किती व्याज होईल ?

" पंचवीस आठे दोनशें पैसे " कलानें तोंडी हिशेब केला.

" पण सावकार म्हणतो, पंचवीस आठे चाळीस दोन, म्हणजे चारशे दोन, त्यांचे आणे झाले शंभर, वरचे दोन पैसे तुला सूट ! "

" चुकलं कीं सगळंच ! " कुमार ओरडला.

" होय कीं; पण सावकाराला भोळ्या लोकांकडून पैसा लुबाडायची होते बुद्धि; अन् म्हणून तो असा खोटानाटा हिशेब करतो. शिवाय वेळेवर पैसे आले नाहीं तर दुप्पट-तिप्पट मागायचे, ते मिळेनातसे झाले तर फिर्यादी करायच्या, घर शेत जप्त करायचं, वगैरे ! अनेक तऱ्हांनीं त्या अडाणी गरजवंत गरीब लोकांना छळायचं, लुबाडायचं आणि गब्बर व्हायचं ! हा जो सावकारींतला अट्टल बदमाषपणा, त्यांत ह्या गोष्टींतला सावकार तरबेज होता.

त्या सावकारानं पुष्कळ वेळां पाहिलं होतं कीं स्वामीजी त्या बाईकडून नेमानें भिक्षा घेऊन जातात.

' पण आपल्याकडे चुकुन सुद्धां फिरकत नाहींत तें कां ? ' असा त्याला प्रश्न पडे. त्यांत त्याला कमीपणाही वाटूं लागला. आपला एवढा प्रचंड वाडा स्वामीजींना काय दिसत नाहीं ? अन् तें पडकं घर तेव्हढं दिसतं ? आपण एवढे श्रीमंत म्हणून प्रसिद्ध असून आप-

त्याकडे ढुंकुन सुद्धां बघूं नये ह्या बुवानं ? अन् त्या दरिद्री बाईकडे मात्र आगत्यानं जावं ? ही रुखरुख त्याला लागून राहिली. शेवटीं मनाशीं त्यानं ठरवलं आणि एक दिवस तो पाळतीवर राहिला. आणि रामदासस्वामी दारावरून पुढें जाऊं लागतांच त्यांना हाक मारली व मनांतली सर्व रुखरुख मोठ्या आढ्यतेनें सांगून टाकली. स्वामीनीं त्याचं बोलणं शांत चित्तानं ऐकून घेतलं आणि

*दाता एक रघुनंदन, वरकड लंडी देईल कोण*

असे आपल्याशींच म्हणत म्हणत पुढें चालूं लागले. सावकारानें लगेच त्यांना आडवलं आणि विनंति केली " आपण आज माझ्याकडे भोजन घेतल्याशिवाय जातां कामा नये. "

स्वामी म्हणाले, छें, तें घडणार नाहीं.

**सावकारः**—असं कां ?

**स्वामीः**—कारण मला विचारूं नका.

**सावकारः**—मला समजलंच पाहिजे तें.

**स्वामीः**—स्वतांची निंदा श्रीमंतांना ऐकवणार नाहीं.

**सावकारः**—निंदा ? अन् काय म्हणून ?

**स्वामीः**—तुमचं अन्न चांगलं नाहीं !

**सावकारः**—वा: स्वामी महाराज ! आपण मात्र पाहिल्याशिवायच ही निंदा करीत आहां ! उत्कृष्ट मेजवानीचा बेत केला आहे मी ! त्या दरिद्री बाईच्या अंगणांतील मातीच्या चिमटीपेक्षां माझ्या कडील स्वयंपाक खास बेचव नाहीं.

**स्वामीः**—तिच्या घरच्या मातीला जी रुची आहे ती तुझ्याकडील पंचपक्वान्नांना नाहीं.

**सावकारः**—कांहीं तरीच बोलण्यापेक्षां—

**स्वामी:**—" विचारे तुझा तूंचि शोधून पाहे ! "

**सावकार:**—प्रचीति शिवाय मी तें खरं कां मानावं ?

**स्वामी:**—तुझा आग्रहच दिसतो. चल, तुझा संशय फेडतों. कदाचित् प्रभुरामचंद्राच्या योजनेनें तुझा उद्धार होण्याचाच क्षण आला असेल तर मी तरी—त्या रघुवीराचा दास—कशाला आढेवेढे घेऊं ? आण, तुझ्या घरांतल्या अन्नाचं ताट वाढून आण.

' स्वामींना वळवलं कीं नाहीं ' असा सावकासला मनांतल्या मनांत अभिमान वाटूं लागला. त्या भरांत त्यानें घरांतून मोठ्या दिमाखानं चांदीच्या ताटांत पंचपक्वानं घालून आणलीं. स्वामीनीं त्या ताटांतील



भाताची शुभ्र मूद मुठींत घेतली आणि मुखानें ' जयजय रघुवीर समर्थ ' असा जयघोष करीत त्या भाताचा घट्ट मुटका वळला. त्या बरोबर, त्यांतून लाल थेंब टप टप टप खालीं पडले.

*अहंतागुणें वाद नाना विकारी*
*तुटे वाद संवाद तो हीतकारी ।*

असा श्लोक म्हणून स्वामी आपल्या वाटेला लागले. पण सावकाराला कांहींच उलगडा झाला नाहीं. तो म्हणाला 'स्वामीमहाराज जरा थांबा. हा काय चमत्कार आहे तो मला उमगत नाहीं.' इतका प्रकार होत आहे तों रस्त्यावरून जाणारे येणारे बरेच लोक तिथें गोळा झाले होते. स्वामींचा जयघोष ऐकून समोरच्या पडक्या घरांतील ती दरिद्री बाई देखील तिथें आली. स्वामी आतां काय सांगणार याकडे सगळ्यांचं चित्त लागलं.

स्वामी म्हणाले, "लक्ष्मीपुत्रा, तुझ्या घरचं अन्न दुष्ट आहे. तुझी कमाई सरळपणाची नाहीं. गोरगरीबांना छळून, गरजवंतांना नाडून, अडाण्यांना लुबाडून, दुर्बळांना भिकेला लावून तूं व्याज मिळवतोस. लोकांचा तळतळाट घेऊन, लोकांच्या मुंड्या मुरगाळून मिळवलेल्या व्याजाच्या अन्नांतून रक्ताच्या चिळकांड्या कशा उडतात तें तुला दाखवलं. तुला हें अन्न गोड वाटत असलं तरी असल्या अन्नाचा मी घास कसा घ्यावा? तुझ्याकडचा घास मी घेतला तर तुझ्या व्यवसायाला माझी संमति आहे असं ठरेल. तुझा प्रतिकार करणारा तो राम कोदंडधारी! मी फक्त असहकार करूं शकतों आणि तो आजवर करीत आलों. असो, जाऊं दे मला."

रामदास स्वामींचे हे उद्गार ऐकून त्या गरीब बाईनें 'गुरुमाऊली' म्हणून त्यांच्या पायांवर डोकं ठेवलं. स्वामीजी पुन्हां म्हणाले, "गर्विष्ठपणानं ह्या बाईच्या गरीबीला तूं नाक मुरडतोस; पण तुला कुठं ठाऊक आहे कीं काबाडकष्ट करून इमानानं मिळवलेल्या पैशांच्या धान्यांतून

गोरसाच्या धारा गळतात. तुला पाहायचं आहे ? तीही प्रचीती घे. जा, बाई, तुमच्या घरांतलं एक चिमुटभर धान्य आणा." बाईनें पळत जाऊन, मूठभर धान्य आणलं. स्वामींनीं तें मुठींत घेऊन पूर्वीप्रमाणेंच पिळलं. त्यासरशी, गाईच्या कासेंतून धारा गळाव्यात तशा दुधाच्या धारा मुठींतून सांडूं लागल्या.

सावकार खजील झाला. त्याचा गर्व नाहींसा झाला. आपल्या दुष्ट आचरणाचा त्याला एकदम पश्चात्ताप झाला. तत्काळ स्वामींचे पाय धरून तो प्रार्थना करूं लागला, "गुरुमहाराज, मी भयंकर अपराधी आहें. आजवर मी अन्यायानं मिळवलेलं हें घर-दार, धन-दौलत, सारं कांहीं सोडून देत आहें. आपला शिष्य म्हणून मला आपल्या पदरीं घ्या. आपली सेवा मला करूं द्या. बैरागी बनून मी आपल्यामागें येणार. गुरुमाउली ह्या चुकलेल्या मुलाला आपल्या कुशींत घ्या."

स्वामींनीं पाहिलं कीं ह्या गृहस्थाला खरोखरीच पश्चात्ताप झाला आहे. परंतु एकदम संसार सोडून, अंगाला राख फासून, घराबाहेर पडणें ह्याला अवघड जाईल. म्हणून त्यांनीं प्रथम त्याला—

*विवेकें क्रिया आपुली पालटावी*
*अती आदरें शुद्ध क्रीया धरावी*
*मना वासना दुष्ट कामा नये रे*
*मना सर्वथा पाप बुद्धी नको रे*
*मना धर्मता नीति सांडूं नको हो*
*मना अंतरीं सार विचार राहो.*

एवढाच उपदेश केला. आणि "कल्याण करी रामराया" असा त्याला आशीर्वाद देऊन त्यांनीं वाट धरली. त्या दिवसापासून त्या

सावकारानें रामदासस्वामींच्या पादुका आपल्या देव्हाऱ्यांत पुजेसाठीं नेऊन ठेवल्या. आणि मस्तवालपणा टाकून देऊन, सचोटीनें व परोपकार बुद्धीनें तो व्यवहार करूं लागला.

३

गोष्ट ऐकून कुमार बराच बुचकळ्यांत पडल्यासारखा दिसूं लागला. नानांनीं विचारलं " का, कुमार, कशी आहे गोष्ट ? "

" नाना खरंच का हो सगळ्या सावकारांच्या अन्नांत रक्त असेल ? मग आपण कसे त्या चिंतोपंत सावकारांच्या घरीं जेवायला जातों ? "

नाना म्हणाले " बरोबर अ हे कुमारचा प्रश्न. गोरगरीबांच्या मुंड्या मुरगाळून जे श्रीमंत झाले असतील त्यांच्याकडे अन्न घेऊं नये. पण असा कडक नियम ज्याला पाळायचा असेल त्यानें स्वतांही पण अतीशय खरेपणानं, इमानानं, दुसऱ्याला कसल्याही प्रकारचा त्रास न देतां—म्हणजे अगदीं साधूसारखं राहिलं पाहिजे. "

" एवढीच का गोष्ट ? " कलाची भूक भागली नव्हती.

" आम्हांला मोठी गोष्ट पाहिजे. आम्ही नाहीं इतक्यांत तुम्हांला सोडणार. "

तूं आहेसच तशी—

तशी म्हणजे कशी ?

चिकट मावशी !

इतकं म्हणून नाना विचार करूं लागले.

" वेणी कांहीं दोन पेडांची घालत नाहींत; तिसरा पेड पाहिजे." कलाची आई म्हणाली.

" म्हणजे ? तुलाही आवडलं वाटतं हें चऱ्हाट ? पण आतां तिसरा पेड कुठं आहे ? हां, हां ! सांपडला बरं का ! ऐका हं मुलांनो !

त्याच काळीं आपल्या ह्या देशांत शिवाजी महाराजांनीं स्वराज्य स्थापलं होतं. त्यांना ही बातमी गुप्तहेरानं सांगितली.

" ही म्हणजे कोणती ? " कुमारनें विचारलं.

" गुप्तहेर कसला ? " कलानं प्रश्न केला.

" ही बातमी म्हणजे रामदास स्वामींनीं त्या सावकाराच्या घरचं अन्न घेतलं नाहीं. त्यांनीं त्यांतून रक्ताची धार काढून दाखविली. " नाना सांगूं लागले. " तूं काय विचारलंस ? गुप्तहेर म्हणजे काय ? नाहीं का ? अग, त्या काळीं अलीकडच्या सारखीं वर्तमानपत्रं नव्हतीं आणि टपालाची व्यवस्था नव्हती. पण राज्यांतल्या सगळ्या नवलाईच्या, महत्त्वाच्या, न्यायान्यायाच्या बातम्या तर राजाला कळायला हव्यात. म्हणून त्या काळीं राजे लोक ठिकठिकाणीं आपलीं विश्वासांतलीं माणसं नेमीत असत. त्यांनीं गुप्तपणानं—लपून छपून, आडून, वेषान्तरानं, कुणाला संशय येऊं नये अशा सावधगिरीनं सगळीकडे हिंडायचं, आणि कुठं काय चाललंय तें हेरायचं—त्याचा कानोसा घ्यायचा—आणि ताबडतोब राजाला कळवायचं. ह्या कामगिरीवर असणारे लोक म्हणजे गुप्तहेर. आणि उघडपणें हिकडचे निरोप तिकडे पोंहोचविण्याचं काम स्वारांच्याकडे, जासूदांकडे असायचं. "

" बरं, मग काय झालं ? " कलानं विचारलं. गोष्ट ऐकायला ती अगदीं अधीर झाली होती.

ती बातमी ऐकून शिवाजी महाराज एकदम फिकीरींत पडले.

सावकाराच्याकडचें अन्न जर स्वामीजी घेत नाहींत तर माझ्याकडची भिक्षा तरी ते कशी घेतील ? असा त्यांच्या मनांत प्रश्न उभा राहिला. मनांतल्या मनांत ते आपली सावकाराशी तुलना करूं लागले. आपण तरी हें राजवैभव कसं मिळवलं ? मुसलमानी राजांचे खजीने लुटले. षाइस्तेखानाचीं बोटं छाटलीं. अफझलखानाच्या पोटांत वाघनखं खुपसून त्याचा कोथळा बाहेर काढला. आपल्या जातीचे जे लोक राजीखुषीनें आपल्या बाजूला वळले नाहींत त्यांचा कांटा काढला. लढाया जिंकण्यासाठीं आपल्या जातभाईंना भरीला घालून युद्धांत त्यांची हत्या व्हायला कारणीभूत झालों.— छे, छे, छे ! मारामाऱ्या, लुटालूट, खून, रक्तपात !—सगळी पापांचीच भुतावळ माझ्या भोंवतीं उभी राहत आहे. कोण मला चांगला म्हणणार ? घरोघर माझ्या नांवानं बाया-बापड्या बोटं मोडत असतील, पोरकी पोरं मला शिव्याशाप देत असतील. ”

शिवाजीच्या डोक्यांत असं एकच काहूर उठायला आणि एकदम ‘ जयजय रघुवीर समर्थ ’ असा जयघोष त्याच्या कानीं यायला एकच गांठ पडली. शिवाजीनं तत्काळ ओळखलं कीं हा श्रीरामदासस्वामींचाच आवाज ! माझ्या मनांतलं काहूर अंतर्ज्ञानानं ओळखूनच स्वामीमहाराज आज अवचित अवतीर्ण झाले असावेत ! बस्स, ठरलं ! पापानं बरबटलेले हे हात आत्तांच्या आत्तां धुवून टाकून आपण निर्मळ व्हायचं ! तोंच स्वामीजी समोर ठाकले व त्यांनीं लगेच शिवाजीपुढें झोळी पसरली.

शिवाजीमहाराजांनीं हात जोडून विचारलं “ माझी भिक्षा घेण्याची आपण कृपा कराल ना ! ”

१९०२



रामदासः—( आश्चर्यानं ) हें असं काय विचारतां ! भिक्षे-साठीं तर मी ही झोळी पुढं केली आहे.

शिवाजीः—( नम्रपणें, भीत-भीत ) त्या सावकाराप्रमाणें माझी निर्भर्त्सना व्हायची नाहीं ना ?

रामदासः—( हंसून ) आधीं भिक्षा तर घेऊन या राजे. मग येईलच प्रचीती आपणाला.

शिवाजीः—मग स्वामीमहाराजांनीं मला असं बहुवचनीं कां संबोधावं ! मी एक दासानुदास आहें. एकवचनी संबोधनाचीच माझी लायकी.

रामदासः—तसं कां होईना. शिवबा, घेऊन ये तुझी भिक्षा नि पाहा स्वीकारतों कीं नाहीं !



शिवाजीनें लगेच आपली तरवार समर्थांच्या पायाशीं ठेवली आणि पाय धरले.

**रामदासः**—हें काय शिवबा ?

**शिवाजीः**—स्वामीजी, हीच माझी भिक्षा. लक्षावधी लोकांच्या रक्तानं बरबटलेली ही तरवार मी आपल्या चरणीं वाहिली असून, रक्तपातानं मिळवलेलं हें माझं राज्य मी आपल्या झोळींत टाकतों. ( आपल्या चिटणिसाकडे वळून ) जा राज्याच्या सनदा स्वामी महा-राजांच्या नांवें करून आणा ताबडतोब.

**रामदासः**—भिक्षा मागणाराला कोणी राज्य घालीत नाहीं आणि भीक मागून मिळवलेलं राज्य कोणाला राखतांही येत नाहीं.

**शिवाजीः**—ह्या राज्यपदाचा लोभ ठेऊन मी आजवर पापाचे डोंगर मात्र रचीत आलों आहें.

**रामदासः**—आज हें काय वेड घेतलं आहे तुझ्या मनानं ? वैराग्य वीरासाठीं नसतं.

**शिवाजीः**—आपल्याप्रमाणें कुबडी धारण करून मी इतःपर श्रीरामप्रभूच्या भजनपूजनांत बाकीचं आयुष्य वेंचणार.

**रामदासः**—क्षत्रियाच्या हाताला कुबडी हें भूषण नसून खड्ग हेंच भूषण आहे. श्रीरामचंद्रांनीं हातांत स्मरणी नव्हती घेतली; धनुष्य-बाण घेतला होता ?

**शिवाजीः**—स्वामीजी, शरण आलेल्याला आपण सन्मार्गाला लावतां ना ? ( चिटणीसांनीं तयार करून आणलेल्या राज्याच्या सनदा स्वामींच्या झोळींत टाकतो. )

**रामदासः**—राजा सगळ्यांचा सन्मार्ग एकच नाहीं. मी लंगोटी लाविली तरी तुला दुर्जनांच्या पारिपत्यासाठीं कंबरच कसली पाहिजे. मी हातांत माळ घेतली म्हणून तूं ढाल टाकायची नाहींस. जनसेवा

ही देखील ईश्वरसेवाच होय. ह्या देशांत गरीब जनता सुखासमाधानानं घास खाऊं लागली, तिचा छळवाद संपला, तिला पाठीराखा मिळाला, साधुसंतांना अभय प्राप्त झालं, आणि ब्राह्मणांना

*उदंड जाहले पाणी । स्नानसंध्या करावया !*

राजा, असे संतोषाचे उद्गार काढायला कोणाचं कर्तृत्व कारण झालं ? नष्ट होऊं लागलेल्या हिंदुधर्माची पुन्हां बळकट स्थापना करणारा नरसिंह तूं ! हिरण्यकश्यपूच्या वधाचं कधीं पाप लागतं काय ? स्वराज्याचा पाया घालणारा तूं ! भारतीय युद्धाच्या आरंभीं अर्जुनाला भूल पडली होती. तसलंच तुझं हें वेड दिसतंय ! हें भलतं वेड मनांतून काढून टाक आणि आजवरचें हेंच व्रत श्रेष्ठ धारिष्ठ ठेवून असंच चालूं ठेव. त्यांतच तुझं कल्याण आहे. तुझी ही भिक्षा मला भणंगाला काय करायची ? मला भणंगाला तूं भूपाल करतोस; पण तुझ्यासारखा अवतारी भूपाल भणंग व्हावा हें मला कसं पाहवेल ? तुझ्या हातून महाराष्ट्राचा स्वराज्य-संसार उभारला जावा अशीच परमेश्वरी योजना दिसते. त्या परमेश्वरी हेतूचा असा खेळखंडोबा करून आपण दोघेही देवाच्या दरबारीं महान् अपराधी ठरूं ! ज्याचं जें कर्तव्य तोच त्याचा धर्म-मार्ग ! ( असं म्हणून स्वामींनीं त्याची तरवार त्याच्या हातांत परत दिली ).

**शिवाजी:**—पण एकदां दिलेलं दान मी परत कसं घेऊं ?

मध्येंच कुमारच्या तोंडून उद्गार निघाला—

*दिलेलं दान घेतलं दान*
*पुढल्या वर्षी मुसलमान*

नाना म्हणाले " आणि शिवाजीनें तर त्याकाळीं मुसलमानांच्या विरुद्धच लढाई पुकारलेली ! मग तो दान परत घ्यायला कसा तयार होईल ? पण स्वामींच्या आज्ञेबाहेर तरी कसं जायचं ? स्वामींनीं झोळींतून सनदाही काढून परत देऊं केल्या. तेव्हां शिवाजी म्हणाला " स्वामीजी, आपला प्रसाद, ह्याच एका भावनेनें हें राज्य मी परत घेत आहें. " त्यावर, प्रसन्न होऊन स्वामी म्हणाले, " आतां मला भिक्षा घाल. "

**शिवाजी:**—गुरुमहाराजांनींच मागावी जी इच्छेला येईल ती.

**रामदास:**—बरं आहे, मी मागतों. माझी ही भगव्या रंगाची छाटी घे आणि हिचाच झेंडा कर. मराठेशाहीचा झेंडा भगवा असावा. एवढी मला भिक्षा घाल.

**शिवाजी:**—गुरुमहाराजांची आज्ञा मला शिरसावंद्य आहे. ( चिटणिसाकडे वळून ) चिटणीस, प्रत्येक गडकऱ्याला कळवा कीं बुरुंजावर भगवा झेंडा फडकूं लागला पाहिजे. गांवोगांवच्या पाटलांना कळवा कीं चावडीवर भगवा झेंडा उभा राहिला पाहिजे. चहुमुलुखीं दवंडी पिटा कीं आजपासून मराठ्यांचा झेंडा भगवा !

**रामदास:**—शिवबा, येतों आतां ! एवढंच सांगायचं कीं:—

*समया सारिखा समय येना । नेम सहसा चाले ना*
*नेम धरितां राजकारणा । अंतर पडे*
*अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावे*
*हटनिग्रही न पडावें । विवेकी पुरुषें*
*अमर्याद फितवे खोर । यांचा करावा संहार*
*शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य*

*उपाधीस जो कंटाळला । तो भाग्यापासून चेवला*
*समयीं धीर सांडिला । तोहि खोटा*

शिवाजीनं 'जय गुरु माउली' म्हणून पायांवर डोकं ठेवलं. आणि स्वामी 'कल्याण करीं रामराया' हें पद गात गात दूर एकांता-साठीं अरण्याच्या वाटेस लागले.

"छे बुवा! मी जर रामदासस्वामींच्या जागीं असतों तर मी कांहीं राज्य परत दिलं नसतं!" कुमार गादीवर कलंडतांना म्हणाला.

"पण मग शिवाजीनं तुझ्यासारख्या लोभी बुवाच्या झोळींत राज्याच्या सनदा टाकल्याच नसत्या" नाना म्हणाले.

"शिवाजीमहाराज मोठे कावेबाज होते म्हणायचं!" शरदनें हळूंच शेरा मारला.

"तें कसं काय?" नानांनीं खुलासा विचारला.

"म्हणजे रामदासस्वामीसारखे ऐहिक ऐश्वर्याकडे पाठ फिरविणारे साधुपुरुष आपलं राज्य परत केल्याशिवाय राहणार नाहींत, अशी त्याला खात्री वाटल्यामुळेंच राज्याची भिक्षा घालण्याचा उदारपणा दाखवून फुकटांत मोठेपणा मिळवायचा त्यानं कावा साधला नाहीं कां?" शरद म्हणाला.

"छे छे, शरद! असला मतलबी प्रकार हा नव्हे. रामदास-स्वामीही कांहीं कमी धूर्त नव्हते. निष्ठेच्या अभावाचा वास त्यांना आल्याशिवाय राहिला नसता. मग त्यांनीं मतलबी शिवाजीची फजीती करायला कमी केलं नसतं. घटकाभर असंही समजूं कीं शिवाजीचा कावा रामदासांना ओळखला नसेल; भाबडेपणानंच त्यांनीं त्या प्रका-राकडे पाहिलं असेल. तरीपण, दुसरी गोष्ट लक्षांत घ्यायला पाहिजे

ती ही कीं शिवाजीची रामदासस्वामींच्या ठिकाणीं तितकी असीम श्रद्धा नसती तर रामदासस्वामींनीं झेंड्यासाठीं दिलेल्या भगव्या छाटीची त्यानें हुर्यावडी नसती कां उडवली ? त्याची तशी पुरेपूर श्रद्धा होती म्हणूनच भगवा झेंडा हिंदुपदपादशाहीचें निशाण म्हणून फडकूं लागला. आणि हेंही तुला ठाऊक असेल कीं त्या वेळेपर्यंत चालू असलेली जोहार करण्याची पद्धत, रामदासस्वामींच्या सांगण्यावरून बंद करून, 'रामराम' करण्याची पद्धत सुरू झाली. शिवाजी महाराजांनीं समर्थांना गुरुस्थानीं मानलं होतं.

कला-कुमारांची आई म्हणाली "छान आहे कीं ही भगवी गीता."

---

# चंदूचा गनीमी कावा

# प्रस्तावना

'चंदूचा गनीमी कावा' म्हणजे एक बेछूट स्वप्नरंजन आहे. जागेपणींच्या असल्या स्वप्नरंजनांत हास्यास्पद कल्पना आणि बालिश विचारसरणी न आली तरच नवल! बोलून चालून बालबुद्धि ती! बहुरूपी दारांत येऊन एकदम नाहीं का तगादा करीत 'लग्नाला चला, काकू, लग्नाला चला' म्हणून? 'ढेकणांच्या गाड्या' जुंपूनच तो दारांत आलेला असतो. 'खडी-साखरेची आमटी आणि लोण्याची भजी' करणारे स्वयंपाकी त्यानें त्या लग्नकार्यासाठीं ठरविलेले असतात. तसाच कांहींसा प्रकार चंदू करीत आहे असें आढळेल. "मोतिबाग" मधील "मिठाईवाला" सगळ्यांना आवडला. मग 'चंदूचा गनीमी कावा' देखील आपणांस आवडायला हवा. तो 'मिठाईवाला' आणि 'गनीमी कावा' लढविणारा हा 'चंदू'—एकाच अकलेच्या खंदकांतून अवतीर्ण झालेलीं हीं रत्नें आहेत.

—यशवन्त

# चंदूचा गनीमी कावा

चंदूच्या शेजारच्या खोलींत ज्ञानेश्वर नांवाचा एक विद्यार्थी कसलेसें पुस्तक वाचीत होता. मोठमोठ्यानें वाचण्याची त्याला खोड असल्या-मुळें चंदूला त्याचें अभ्यासासंबंधींचें वाचन खडा-न्-खडा ऐकूं येई. आज तो जें पुस्तक वाचीत होता त्यांतल्या मजकुरावरून चंदूनें कयास केला कीं ज्ञानेश्वर इतिहास वाचीत आहे. चंदूच्या कानीं खालील वाक्यें आलीं:—

" कल्पनासिंधूच्या उत्तर किनाऱ्यावर मनोराज्य नांवाचें एक अफाट राज्य पसरलें होतें. तें राज्य फार अजिंक्य असल्याबद्दल सर्वत्र ख्याती होती. विवेक घराण्यांतील राजे त्या राज्यावर वारंवार स्वाऱ्या करीत आले. पण आल्या अरिष्टापुढें, लव्हाळ्याप्रमाणें, तात्पुरतें नमतें घेऊन, तें फिरून आपलें मस्तक ताठ करायचें व टिकाव धरून राहायचें. असा त्या राज्याचा कक शतकांचा दुर्दम्य चिवटपणा होता. त्या राज्यांतील सर्वांत मोठी जी वासना नदी, ती ज्या डोंगरांत उगम पावते त्या डोंगरावर आशाळगड नांवाचा एक बेलाग किल्ला आहे. तो तर कुणालाच जिंकतां आला नाहीं असें म्हणतात. "

चंदू मोठा हिकमती मुलगा हाता. ज्ञानेश्वराच्या इतिहासांतील तो मजकूर ऐकत असतां, त्याच्या डोक्यांत नहमीप्रमाणें विचाराचें चक्र फिरूं लागलं. " खरंच, इतका का हा आशाळगड अवघड आणि भक्कम आहे ? त्या युक्तीबाज तानाजीनें घोरपडीच्या सहाय्यान कोंडाण्याची कोंडी फोडली ! खरंच, आपणालाही तो आशाळगड

सर करण्याच्या कामगिरीवर जर एकाद्या शिवाजीनें धाडलं आणि खरो-खरीच त्या किल्ल्याला वेढा देण्याची आपणावर पाळी आली तर काय मजा होईल ! आपण अशी कांहीं बहादुरी करून दाखवूं कीं यंव ! ”

झालं, विचाराच्या वावटळींत सांपडलेल्या चलाख मुलाचें डोकें फारच जलद चालतें. चंदूच्या मनानें आशाळगडाला वेढा द्यायचा बेत मुक्रर केला आणि त्या स्वारीच्या पूर्व तयारीच्या तपशीलाचीं टाचणें मनांतल्या मनांत करायला त्यानें सुरवात देखील केली.

“ पहिल्यांदा शिष्टाई ! महाभारतांतच मुळीं तसें सांगून ठेवलें आहे. कौरव-पांडवांचें तें भयंकर युद्ध सुरू होण्यापूर्वीं धर्मराजानें श्रीकृष्णाला शिष्टाईला पाठवल होतें. आपणाला असा देवमाणूस कोण मिळणार ? पण रामानें रावणाच्या दरबारीं शिष्टाई करण्याकरतां अंग-दाला रवाना केलें होतें. वानरही शिष्टाई करूं शकतो, हा जुना आधार बरा आहे. अर्थात् आपणही तशाच एकाद्या वृद्धाकडे शिष्टा-ईची कामगिरी सोंपविली पाहिजे. पण आशाळगडाचे बुरुज तर भरभक्कम आणि दरवाजे बंदिस्त आहेत, असं म्हणतात ! ”

ज्ञानेश्वराला मधेंच लहर आली कविता म्हणायची ! दुसरा कोणी ऐकत असेल, ह्याची जाणीव नसली म्हणजे विद्यार्थी, न बुजतां, वाटेल तसे हेल काढून कविता म्हणत असतात. ज्ञानेश्वराचें त्या वेळचें कविता-गायन ऐकून चंदूला हांसायलाच आलं असतें. पण तो सध्या जरा फिकरींतच होता. तेव्हां, कान देऊन ऐकूं लागला तो. ज्ञानेश्वर घोकत होता—

*म्हातारी आली तरंगत मुलगीला दिसली*
*तिच्या शिरावरुनी तधीं ती गिरक्या घे उडुनी*

*हसत वरी करुनी हात, ती घरूं म्हटे फिरुनी*
*त्या चलनें वरती उडाली म्हातारी वरती*
*वारा तो तिजला लागला दूरच न्यायाला*
*चुंबुनि कन्येला वदे मी मग म्हातारीला*
*थांब थांब जाशी अशी कां ? फिर ये गे मजशी ॥*

हें ऐकून चंदूनें खुषींत येऊन एक चिटकी वाजवली. तो बेत जुळवूं लागला—

" हां, हां. हें नामी होईल ! गडकऱ्याला किंवा रखवालांना बिलकुल चाहूल न लागतां त्या किल्ल्यांत ' म्हाताऱ्यां ' शिवाय दुसऱ्या कुणाला शिरकाव करून घेतां येणार आहे ? म्हाताऱ्या ! म्हाताऱ्या ! ! फुंकराचा कानमंत्र त्यांना एकदां देऊन ठेवला कीं त्यांची भरारी फत्ते झालीच ! अंगदाप्रमाणें उड्डाण मारून त्या शत्रूच्या सभामंडपांत अलगत जाऊन दाखल होतील. आणि त्या परतलेल्या दिसल्या कीं शत्रू शिष्टाई मान्य करीत नाहीं असें समजून आपण एकदम हल्ला चढवायचा !

हल्ला चढवायचा, हें इतकं तर ठरलं ! पण त्या तटबंदीला भगदाड कसं पाडायचं ? सुरुंग लावण्याच्या कामगिरीवर कुणाची बरं नेमणूक करतां येईल ? "

चंदूचें विचारचक्र येथवर येऊन जरा बंद पडलें. तोंच रस्त्यावरून एक काळी ढुस्स मुलगी चालली होती, तिच्याकडे त्याचें लक्ष गेलें. सहज तो दाराच्या चौकटींत येऊन उंबऱ्यावर बसला. त्या मुलीकडे पाहून रस्त्यांतलें एक वात्रट कारटें तिला चिडवीत होतें " घूस, घूस " तेवढयावरून चंदूच्या आडलेल्या विचाराला एकदम गती मिळाली.

" घुशीकडून तटांना सुरुंग लावण्याची, खिडारं पाडण्याची कामगिरी करून घेतां येईल. इतकेंच नव्हे तर भुयारं सुद्धां ह्या



घुशींच्या कडून तयार करून मिळतील. गडावरचें सैन्य नि त्या सैन्यांतले पाहरेकरी मोर्चे बांधून तटावरून खुशाल टेहळणी करीत अहोरात्र बसूं द्या. अशा भुयारांच्या वाटांनीं शत्रू अकस्मात येईल, हें त्यांच्या ध्यानींमनीं सुद्धां येणार नाहीं. आणि मग काय ? एकदम पाठीमागून हल्ला आल्यावर त्यांची जी दाणादाण उडेल—"

इतक्यांत चंदूच्या पोटरीला खाज सुटली. त्यानें कराकरा खाजवलं तिथें. पण खाज कांहीं लवकर थांबेना. उलट, तिथें टचटचीत गांधी

उठल्या आणि त्यांची आग होऊं लागली. त्यामुळें तो बराच बेचैन झाला. ' हा कुठून कहार उद्भवला ' म्हणून तो शोधूं लागला. तों त्याला आढळला एक सुरवंट ! मग काय विचारतां ? चलाख चंदूनें कल्पना लढविली कीं—

" त्या भुयारांतून सुरवंटाचा एक तांडाच द्यावा धाडून त्या किल्ल्यावर ! हे सुरवंट शत्रूला अगदीं सळो कीं पळो करून सोडतील ! खाजवतच बसा म्हणावं आपलीं अंगं ! एकदां का सुरवंटांनीं लगट केली कीं मग दुसरं कुठलं काय सुचतेय ? बंदुका, तरवारी टाकून देऊन आधीं खरारेच हातीं घ्यावे लागतील सगळ्यांना ! अन् मग त्यांचा तो गाफिलपणा आपणाला चांगलाच उपयोगी पडेल ! "

ह्या आपल्या कल्पनेनें चंदू कांहीं वेळ खुशींत होता. पण लवकरच त्याला प्रश्न पडला ' त्या शिपायांना पुरतं कसं नादीं लावून पागल बनवायचं ? समजा, त्यांनीं चिलखतं घातलीं असलीं तर सुरवंटांची त्यावर काय मात्रा चालणार ? कुणाला बरं आतां मसलतींत घ्यावं ? हां, त्या ज्ञानेश्वरालाच विचारूं या ! "

चंदू उठला; तोंच त्याच्या कानावर ज्ञानेश्वराचा अभ्यास पडला. सृष्टिनिरीक्षणाच्या तासाचं पुस्तक वाचून ठेवीत असावा बहुशा तो ! " सुरवंटांचीं कालान्तरानं फुलपाखरें होतात " अशा अर्थाचें ज्ञानेश्वरानें वाक्य उच्चारलें आपल्या खोलींत. चंदूच्या कल्पकतेला तेव्हढा आधार पुरा झाला. तो पुन्हां जुळवीत बसला आपला बेत.

" वा: हें फारच छान झालं ! एका धोंड्यानें दोन पक्षी पाडावे म्हणतात. आपणालाही ह्या सुरवंटांचा दुहेरी उपयोग होईल. अंगाचा आगडोंब उसळण्याचा कार्यभाग जेव्हढा साधेल तेव्हढा ते उरक-

तीलच; पण मागाहून फुलपाखरांचीं सोंगेंही घेतीलच; त्यांचे ते रंगी बेरंगी, चित्रविचित्र, नक्षीदार पंख पाहून कोण भुलणार नाहीं ? अस्मानांतून पऱ्याच उतरल्या कीं काय, असें त्या शिपायांना वाटलेंच पाहिजे ! फुलपाखरांनीं पिंगा घालायला सुरुवात केली कीं कोण वेडावून जाणार नाहीं ? आमचीं हीं फुलपाखरें अतीशय लडिवाळपणा करतील. त्यांच्या गळ्यांत काय पडतील, त्यांच्या खांद्यांना काय बिलगतील, त्यांच्या छातीवर माना टेकतील, त्यांच्याशीं गुलगुल



कानगोष्टी काय करतील, त्यांच्यापुढं गोंडा काय घोळतील ? सगळे शिपाई फिदा झाले नाहींत तर नांव बदलून देईन मी माझं !

" शत्रू आपणाला फार भारी आणि तितकाच कडवा झुंजार ! तेव्हां त्याच्याशीं गनीमी कावाच लढवायला हवा. तरच आपणाला यशाची आशा ! " अशा रीतीनें चंदूची कावेबाज डाव-योजना

चालली होती. ‘ परंतु एव्हढ्यानें संपूर्णपणें फत्ते होईल का नाहीं.’ अशी एक शंका हळूच डोकावूं लागली. “ केव्हां तरी निर्वाणीचा सामना द्यायला लागणारच. तेव्हां, त्या प्रसंगाला तोंड द्यायासाठीं तरतूद काय करायची ” म्हणून चंदू डोकें खाजवूं लागला. अफझुल-खानाशीं जेव्हां गांठ पडली तेव्हां शिवाजीला ऐनवेळीं वाघनखें उपयोगीं पडलीं. तसलं गुप्त हत्यार आपण कोणतं योजावं ? तलवार, ढाल, जंबिया— छे, ह्या हत्याऱ्यांच्या लफड्यांत आपल्याच शिपायांची त्रेधातिरपीट उडायची एकाद्या वेळीं ! तर काय तोंड काढावी ह्या फिकीरीनें ह्या कोडयाच्या उत्तरासाठीं डोकें खाजवतां खाजवतां चंदूचे केस गळायला लागले.

“ आहे, सांपडली युक्ती ! तरी म्हटलं चंदूचं इतकं सुपीक डोकं आज का माळरानासारखं ओसाड व्हायला लागलं ? ही नामी युक्ति आहे कीं ! केसानं गळा कापण्यांत अगदीं तरबेज अशा निवडकच लोकांची एक तुकडी आपण बरोबर न्यायची ! केसू केसकर किंवा कल्लू मिसाळ ह्यांचेपैकीं कोणाला तरी करूं म्होरक्या ! शत्रूला संशय देखील यायचा नाहीं कीं आपणाला हे कंठस्नान घालतील म्हणून ! निःशस्त्रांचं हें राजकारण चांगलं रंगणार ! ” एकदम टाळी वाजवून चंदू उठला. ‘ जमला सगळा व्यूह ’ असं आपल्याशीं मोठ्यानं पुट-पुटला देखील तो. इतक्यांत काय माशी शिंकली कोण जाणे. तो एकदम सचिंत झाला अन् फिरून डोकें धरून खालीं बसला उंबऱ्यावर!

“ दूर दृष्टीचा सेनापती तोच कीं माघार घ्यायची पाळी आल्यास तीही यशस्वीपणें कशी घ्यायची ह्याची देखील जो आगाऊच योजना करून ठेवतो ” असें त्यानें नुकतेंच एका वर्तमानपत्रांत वाचलें होतें;

त्याची त्याला आठवण झाली. " समजा, आपले सगळे बेत हुकले, कांहींच डाळ शिजली नाहीं आणि आपल्याला जिवानीशीं पळ काढावा लागला तर तो सुरक्षितपणें कसा काढायचा ? गनीमी काव्यांत शिवाजीच्या वेळचे सारेच लोक फार तरबेज होते. त्यांचा कांहीं दाखला सांपडतो का ? " म्हणून त्यानें एक भली मोठी बखर चाळायला सुरवात केली. आणि त्याला हवा होता तसा दाखला चटकन मिळालाही. " एकदां म्हणे, रातोरात पळ काढायची पाळी आली असतांना, शिवाजीनें काय युक्ती केली, एक बैलांचा कळप तयार केला; त्या बैलांच्या शिंगांना तेलांत भिजवलेले बोळे बांधून ते पेटवले आणि ते बैल दिव्याच्या घाटांतून पिटाळून लावले. पाठलाग करीत असलेल्या शत्रू-सैन्याला वाटलें कीं, ते दिवे दिसतात ना—त्या मशालच्या उजेडांत शिवाजी आपल्या लोकांनिशीं पळून जात असावा. आणि ह्या कल्पनेनें त्या पाठलाग करणारांनीं दिव्याच्या घाटाची वाट धरली; आणि इकडे शिवाजीनें मात्र भलत्याच रस्त्यानें गुपचुप पलायन केलें. आपल्यालाही तोच कित्ता गिरवतां येईल. काजव्यांचा एक थवा आपण बरोबर बाळगूं आणि तो ऐनवेळीं उडवून लावूं एका दिशेला आणि आपण लागूं भिन्न दिशेला. आपला पाठलाग करणारें सैन्य जाईल काजव्यांच्या रोखानें आणि पडेल कोठें तरी दरींत किंवा दलदलींत ! आपण शिरसलामत निसटणार ह्या युक्तीनें ! "

चंदूला इतका आनंद झाला आपल्या ह्या व्यूहाचा, कीं त्यानें टुणकन् उडी मारली. त्या उडी सरशी त्याचं डोकं आपटलं दाराच्या चौकटीला. त्याबरोबर त्याच्या [illegible] लागले !

—

IRBK-0101902